N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District** (जिल्हा): पुणे ग्रामीण **P.S.**(ठाणे): रांजनगांव एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशन

**FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0136 **Year** (वर्ष): 2025

**Date and Time of FIR** (प्र. ख. दिनांक आणि वेळ): 29/04/2025 03:06

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence** (गुन्ह्याची घटना):

1. **Day**(दिवस): सोमवार

**Time Period** (कालावधी):

**Date From** (दिनांक पासून): 28/04/2025
**Date To** ( दिनांक पर्यंत): 28/04/2025
**Time From** (वेळेपासून): 09:30 बजे
**Time To** (वेळेपर्यंत): 14:47 बजे

(b) **Information received at P.S.** (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):

**Date** (दिनांक ): 29/04/2025 **Time** (वेळ): 01:39 बजे

(c) **General Diary Reference** (रोजनामचा संदर्भ ):

**Entry No.** (नोंद क्र.): 005

**Date & Time** (दिनांक आणि वेळ): 29/04/2025 01:39 बजे

4. **Type of Information** (माहितीचा प्रकार): लेखी

5. **Place of Occurrence** (घटनास्थळ):

1.(a) **Direction and distance from P.S.**(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):
दक्षिण, 13 किमी **Beat No.** (बिट क्र.):

(b) **Address** (पत्ता): ग्रामपंचायत भांबर्डे,ता शिरुर, जिपुणे

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.**(पोलीस ठाण्याचे नाव):

**District(State)** (जिल्हा(राज्य)):

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): श्री. संदिप मिमराव रोडे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1988

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मु पो भाबर्डे,ता शिरुर, जि पुणे,रांजनगांव एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मु पो भाबर्डे,ता शिरुर, जि पुणे,रांजनगांव एम.आय.डी.सी.पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9850160144

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्रीमती निर्मला कैलास भुजबळ | | | 1. ग्रामपंचायत भांबर्डे, ,ता शिरुर, जिपुणे,रांजनगांव एम.आय.डी. सी.पोलीस स्टेशन,पुणे ग्रामीण, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रु. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

**S.No.** (अ.क्र.) **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.)

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

रांजणगाव एम आय डी सी पोलीस स्टेशन गुरनं /2025 भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 चे कलम 7 प्रमाणे
फिर्यादी - श्री. संदिप मिमराव रोडे वय 37 वर्षे, व्यवसाय सरपंच रा. मु.पो. भाबर्डे, ता.शिरुर, जि.पुणे मो. 9850160144
आरोपी - श्रीमती निर्मला कैलास भुजबळ, ग्रामपंचायत अधिकारी, (ग्रामसेवक) ग्रामपंचायत भांबर्डे, ता. शिरुर, जि. पुणे
गु घ ता वेळ व ठिकाण - दि 28/04/2025 रोजी 14.47 वा सुमारास ग्रामपंचायत भांबर्डे, ता. शिरुर, जि.पुणे
मिळाला माल-रोख रक्कम-.60,000/- ची लाच रक्कम ग्रामपंचायत कार्यालय भांबर्डे, ता. शिरुर जि. पुणे येथे स्विकारली आहे
हकिगत - मी वरिल ठिकाणी राहण्यास असुन मी शेती व शेती पुरक व्यवसाय करतो. मी वरिल गावचा मागील एक वर्षापासुन सरपंच म्हणुन काम पाहतो. मी सन 2020-2021 मध्ये ग्रामपंचायत भांबर्डे हद्दीत पेवर ब्लॉक बसविण्याचे काम घेतले होते. त्यावेळी सदर कामाची एकुण रक्कम 3 लाख रुपये होती. सदरचे काम मीच पुर्ण केले असुन त्याची बिले मला मिळाली आहेत. आमचे गावातील गायकवाड वाडी येथे अंगणवाडी बांधकामाची मंजुरी जिल्हा परिषद पुणे यांनी दि. 21/06/2024 रोजी ग्रामपंचायत भांबर्डे यांचे नावे कार्यारंभ आदेश दिले होते. सदर अंगणवाडी बांधकामाचा एकुण खर्च 11,24,934/-रु एवढा मंजुर झाला होता. त्यामुळे सदर अंगणवाडी बांधकामाच्या साहीत्य खरेदी निविदा आमच्या ग्रामपंचायती मार्फत काढुन बांधकामाचे काम ठेकेदार श्री. सौरव पवार यांना दिले होते. सदर ठेकेदाराचे बांधकामाचे काही बिल देण्यात आले असुन उर्वरील बिल देणे बाकी आहे. या संदर्भातली सर्व कागदपत्रे मी सादर करीत आहे. दि.20/03/2025 रोजी ठेकेदार श्री. सौरव पवार हे माझ्याकडे येवुन अंगणवाडी बांधकामाचे उर्वरीत बिलाच्या रकमेचा चेक काढण्यास सांगितला असता मी ग्रामसेविका श्रीमती भुजबळ यांना मोबाईल फोन करुन वरिल प्रलंबित कामाच्या बिलाबाबत विचारणा केली असता त्यांनी माझ्याकडे अंगणवाडी बांधकामाच्या बीलाच्या 6 टक्के किंवा 60,000/- रुपये व मी ग्रामपंचायतीच्या हद्दीत पेवर ब्लॉक बसविण्याच्या कामातील टक्केवारी दयावी लागेल असे म्हणुन माझ्याकडे पैशाची मागणी केली होती. त्यावेळी मी त्यांना समक्ष चर्चा करु असे म्हणालो होतो. सदरची मागणी केलेली रक्कम ही लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाल्याने ती देण्याची इच्छा नाही. माझे व श्रीमती भुजबळ यांच्यामध्ये कोणतेही आर्थिक हितसंबंध नसून भांडणतंटा अथवा वैर नाही. म्हणुन अॅन्टी करप्शन कार्यालय, पुणे येथे दि.27/03/2025 रोजी लेखी तक्रार स्वहस्ताक्षरात दिली होती. त्यावर मी व समक्ष म्हणुन पो. नि. माने यांनी सही केली होती. सदर कारवाई साठी सापळा पथक नेमण्यात आले होते. सदर कारवाईतील पंच हजर झाल्यानंतर सदरची तक्रार त्यांना वाचायला दिली असता ती माझ्या सांगणेप्रमाणे बरोबर असल्याने त्यांनी त्यावर स्वाक्षरी केली होती. लोकसेविका श्री. भुजबळ हया आठवडयातुन एकदाच कार्यालयात येत असल्याने पुढील कारवाई दि.01/04/2025 रोजी करण्याची मी विनंती केली होती.

त्यावरुन दि.01/04/2025 रोजी मी सुचविलेप्रमाणे पंच व सापळा पथक असे पुणे-अहिल्यानगर रोड, राजणगाव जवळ, हॉटेल वसुधा येथे पोहचले असता मी सदर ठिकाणी हजर होतो. त्यामुळे पुढील पडताळणी कार्यवाही कामी पोनि. माने यांनी मला व पंच नं 1 श्री. युवराज नवनाथ पाबळे यांना ग्रामपंचायत कार्यालय, भांबर्डे येथे पाठविण्याचे ठरविले. परंतु लोकसेविका कार्यालयात हजर नसल्याने फोनवरुन पडताळणी कारवाई करुन सदर कॉल व्हाईस रेकॉर्डर मध्ये 12/43 वा. सुमारास रेकॉर्ड करण्यात आला. सदर फोनवरील संभाषणावेळी मी त्यांना

की, मॅडम येणारेत ऑफिसला ? त्यावर श्रीमती भुजबळ उद्या येणारे उद्या, का ओ? असे म्हणाल्या, त्यावर मी म्हणालो कीकाय नाय ते थोडं ये, आपलं त्या अंगणवाडीचा नाय का तो विषय सौरवचा, तो विषय थोडा क्लिअर करुन घेतला असता, लय पेमेंटला तगादा लावला त्यांनी ओ त्यावर श्रीमती भुजबळ त्याला दिला की परवा दिवशी चेक असे म्हणाल्या त्यावर मी म्हणालो की, हा ते बाकीचं पेमेंट राहीलेलं ते घ्यायचं होत ना त्यावर श्रीमती भुजबळ नाय ते लगेच नाय देता येणार, मध्ये गॅप पाहिजे ना, नाहीतर परत प्रॉब्लेम क्रियेट होणार, एकतर त्याने सगळं चुकीचं केलय असे म्हणाल्या, त्यावर मी म्हणालो की, नाय ते काय झालय, तो मला भेटला होता, तुम्ही त्याला काय बोलल्या होत्या ना? त्यावर श्रीमती भुजबळ हा, काय? असे म्हटल्यावर मी म्हणालो की, म्हणला, मॅडम सहा टक्क्याची मागणी करताहेत अकरा लाख रुपये पेमेंट ये आपलं मग ते कस करायचं सरपंच, तो मला विचारत होता, त्याला म्हणलं की ठिके, मी मॅडमच्या बरोबर एकदा बोलुन घेतो की नक्की काय करायचयं? म्हणुन म्हणलं नक्की तुमच्या बरोबर बोललो असतो, समक्ष भेटुन बोलु, असे म्हणालो असता श्रीमती भुजबळ ह्या हो असे म्हणुन फोन ठेवुन दिला. यावरुन लोकसेविका श्रीमती भुजबळ यांनी आमचे गावचे अंगणवाडी बांधकामाच्या बिलामध्ये 6 टक्के रक्कम मागणीला स्पष्ट नकार दिलेला नसुन लाच रकमेस समर्थन दिले आहे. सदर पडताळणी मध्ये लाच रकमेची स्पष्टता आलेली नसल्याने सदरची कारवाई समक्ष ग्रामपंचायत कार्यालयात पाठवुन करण्याची विनती केली होती.

त्यानंतर दि. 03/04/2025 रोजी मी सुचविलेप्रमाणे पंच व सापळा पथक असे पुणे-अहिल्यानगर रोड, रांजणगाव जवळ, हॉटेल वसुधा येथे पोहचले असता मी सदर ठिकाणी हजर होतो. त्यामुळे पुढील पडताळणी कार्यवाही कामी पोनि. माने यांनी मला व पंच नं 1 श्री. पाबळे यांना ग्रामपंचायत कार्यालय भांबर्डे येथे माझे बनियचे आत व्हाईस रेकॉर्डर लावुन माझी चारचाकी इनोवा क्रिस्टा क्र. एम एच-12 पी एन-8099 या गाडीने 12/25वा. सुमारास रवाना केले. सदर ठिकाणी श्रीमती भुजबळ व माझी भेट झाली. त्यावेळी आमचेत कामाविषयी चर्चा झाली. सदर चर्चेदरम्यान मी म्हणालो की, बर ते, सौरभचा पण फोन आलता त्या दिवशी तुमचा पण आपल बोलणं झाल ते, त्या संदर्भामध्ये सौरभ म्हणला की, मॅडम साठ हजार रुपये मागतात ए त्यावर त्या हा असे म्हणाल्या. त्यानंतर मी म्हणालो की, मला म्हणत होता की 11 लाख रुपये बिल ये आणि साठ हजार द्यायचे कसे? म्हणलं मी बोलतो काय असेल ते म्हणलं मी देऊन टाकतो मॅडमला सांगतो म्हणलं त्यावर श्रीमती भुजबळ तुम्ही तुमचं त्या तीन लाखाच मला काहीच दिलं नाही असे म्हणाले. त्यावर मी त्यांना ते पण देतो ना त्यावर श्रीमती भुजबळ चेक आला, पण बिल बिल काहीच नाही दिलं असे म्हणाल्या. त्यानंतर मी श्रीमती भुजबळ यांना याचं काय करायचं मग अंगणवाडीच? असे म्हणालो असता श्रीमती भुजबळ बघा तुमच्या ह्यानी, आता काय तुम्ही काही जमूनच घ्यायना, म्हणल्यावर काय सांगायचं आता मी? सांगा बर असे म्हणाल्या, त्यावर मी त्यांना तुम्ही सांगा हे आकडा की एवढं एवढं द्या बॉ विषय संपवा, माझ्या डोक्याला लय हाज्या झालाय ते काम त्यांना असे म्हणालो असता श्रीमती भुजबळ मी काय सांगु? तुम्ही काय अजिवातच, तो मला पेपर देईना, पेपर वाचून माझ डोक पार मला हे की असे म्हणाले. त्यानंतर पुन्हा काही वेळा नंतर मी श्रीमती भुजबळ यांना म्हणालो की. तुमचं जे माझ्याकडे पेमेंट आहे ना, समजा तीन लाख रुपयाच किती द्यायच किंवा ह्याच किती द्यायच ते,क्लिअर कट सांगा मला की तुम्ही एवढं पेमेंट द्या, विषय संपून टाका त्यावर श्रीमती भुजबळ म्हणाल की, तुम्ही तुम्हाला जे योग्य वाटेल ते, मी तुम्हाला काही म्हणणार नाही असे म्हणाल्या त्यावर मी त्यांना अहो किती द्यायच? ते तरी सांगा, योग्य का मी सांगन तुम्हाला की मॅडम10,000/- द्या आणि 20,000/- द्या आणि संपवा असे म्हणालो असता श्रीमती भुजबळ तुम्हाला योग्य वाटलं पाहिजे ना. आता तुम्ही सरपंच आहे, तुम्हाला जे योग्य वाटेल ते तस करा असे म्हणाल्याने मी त्यांना अहो दोन शब्दात सांगा, म्हणजे तो विषय संपून जाईल असे म्हणालो असता मी नाही तसं काही सांगत तुम्हाला योग्य वाटल ते करा, असे श्रीमती भुजबळ म्हणाल्या. त्यानंतर मी श्रीमती भुजबळ यांना म्हणालो की, त्या टीडीएस राहिलेल्या चेक मध्येच करायचंय, पण ते ह्याचा विषय क्लिअर करून घ्या मला सांगायचं त्यावर श्रीमती भुजबळ ह्या नाही तुम्ही तुमच्या मनानी तुम्ही तुमच्या असे म्हणाले असता मी त्यांना म्हणालो की, परत तुम्ही म्हणताल, की एवढंच दिलं, आणि तेवढंच दिलं त्यावर श्रीमती भुजबळ मला म्हणाल्या की, तुमच्या मनाने तुम्ही, पण तुम्ही योग्य ते करा अशी अपेक्षा आहे माझी, तुम्ही योग्य ते करा असे बोलल्याने मी व पंच असे सापळा पथक थांबलेल्या ठिकाणी 13/43 वा. सुमारास परत आलो.

सदर पडताळणी कारवाई दरम्यान श्रीमती भुजबळ व माझ्यात ग्रामपंचायत अंतर्गत अंगणवाडी बांधकामाचे आणि पेवर ब्लॉक बसविलेल्या तीन लाखाचे कामाबाबत चर्चा झाली आहे. सदर चर्चेदरम्यान अंगणवाडी बांधकामाचे बिल काढण्यासाठी, तसेच मी यापुर्वी पुर्ण केलेल्या पेवर ब्लॉकचे बिल काढल्याबाबत श्रीमती भुजबळ यांनी तुम्ही तुम्हाला जे योग्य वाटेल ते, मी तुम्हाला काही म्हणणार नाही, तुम्हाला जे योग्य वाटेल ते तस करा तुमच्या मनाने तुम्ही, पण तुम्ही योग्य ते करा अशी अपेक्षा आहे माझी, तुम्ही योग्य ते करा असे म्हणुन लाच रक्कमेस समर्थन व होकार देवुन लाच मागणी केली आहे. तसेच श्रीमती भुजबळ ह्या आठवडयातुन एकच दिवस ग्रामपंचायत कार्यालयात हजर राहत

असल्याने पुढील भेटीवेळी लाच रक्कम कधी व कुठे द्यावयाची हे सांगतील. त्यावेळी पुढील कारवाई करावी अशी विनंती केली. त्यामुळे पडताळणी कारवाई स्थगीत करण्यात आली. त्यानंतर दि. 15/04/2025 रोजी मी सुचविलेप्रमाणे पंच व सापळा पथक असे दुध संकलन केंद्र, भांबर्डे जवळ पोहचले असता मी सदर ठिकाणी हजर होतो. त्यामुळे पुढील पडताळणी कार्यवाही कामी पोनि. माने यांनी मला व पंच नं 1 श्री. पाबळे यांना ग्रामपंचायत कार्यालय, भांबर्डे येथे माझे बनियचे आत व्हाईस रेकॉर्डर लावुन माझी चारचाकी इनोवा क्रिस्टा क. एम एच 12 पी एन-8099 या गाडीने 12/24 वा. सुमारास रवाना केले. सदर ठिकाणी श्रीमती भुजबळ व माझी भेट झाली. त्यावेळी प्रथम आमचेत ग्रामपंचायत भांबर्डे येथील कार्यालयीन कामाविषयी चर्चा झाल्यानंतर, मी म्हणालो की, बरं ऐकाना, ते पेमेंट तुम्हाला आज देवु का उद्याच्याला देवु ? कसं करु? त्यावर श्रीमती भुजबळ ते जाउ द्या आता, काय आसलं ते बघु नंतर असे म्हणाल्या, त्यावर मी म्हणालो की, काय? त्यावेळी श्रीमती भुजबळ अं, अं, अं, मुदतवाढचं पत्र, मला फाईलला लावायचं, कारण ते आणलं नाय, मुदत संपल्यालीचं ये त्याची असे म्हणाल्या. त्यावर मी म्हणालो की, हम् त्यावर श्रीमती भुजबळ त्याला म्हणावं, ते तिकडुन घे म्हणलं होत त्याला मी, मला म्हणला होता, पुण्याला गेलो की आणतो मी त्याची एक हे करुन झेरॉक्स असे म्हणाल्या. त्यावर मी म्हणालो की, हा ते देतो मी तुम्हाला, पेमेंट आहे माझ्याकडं आत्ता मग? त्यावेळी श्रीमती भुजबळ ते राहुदे असे म्हणाल्या. त्यावर मी ठिके चालतयं असे म्हणुन मी व पंच असे आपण थांबले असलेल्या ठिकाणी 13.25 वा. सुमारास परत आलो. त्यामुळे पडताळणी कारवाई स्थगीत करण्यात आली

दि.15/04/2025 रोजीच्या पडताळणी कारवाई दरम्यान श्रीमती भुजबळ यांनी लाच रक्कमेबाबत जाउ या आता, काय आसलं ते बघु नंतर असे म्हणाल्याने तसेच आमच्या गावची जत्रा व माझ्या वैयक्तीक कामामध्ये मी व्यस्त होतो. दि.27/04/2025 रोजी श्रीमती भुजबळ हया दि.28/04/2025 रोजी कार्यालयात येणार असल्याचे मला समजले. त्यावेळी त्या माझ्याकडुन लाच रक्कम स्विकारण्याची शक्यता असल्याने मी पो.नि. माने यांना फोन करुन पुढील सापळा कारवाई दि.28/04/2025 रोजी करण्याची विनंती केली होती. त्यावरुन आज दि.28/04/2025 रोजी मी सुचविलेप्रमाणे पंच व सापळा पथक असे दुध संकलन केंद्र, भांबर्डे जवळ पोहचले असता मी सदर ठिकाणी हजर होतो. सदरवेळी सापळा कारवाई साठी श्रीमती भुजबळ यांना लाच रक्कम म्हणुन देणेकामी आणलेली माझ्या बचतीमधील रोख रक्कम-60,000/- रुपये हजर केली. त्यावेळी पोनि. माने यांनी सापळा कारवाईसाठी मी दिलेल्या नोटांचे क्रमांक पंच क्र.2 राठोड यांना लिहायला सांगुन नोटांचे क्रमांक लिहुन घेण्यात आले. त्या कागदावर दोन पंचानी व पो.नि माने यांनी सही केली. नमुद लाच रक्कमेस अँथ्रसिन पावडर लावुन, सापळा कारवाईचे प्रात्यक्षीक समजावुन सांगुन तसेच सुचना देवून लाच रक्कमेचे रु.50,000/- व रु.10,000/-चे असे 2 बंडल रबराने पॅक करुन माझ्या पॅटच्या पुढील उजव्या खिशात ठेवण्यात आले. आमचे सापळा निवेदन घेवून मला व पंच नं 1 श्री. पाबळे यांना ग्रामपंचायत कार्यालय, भांबर्डे येथे माझे बनियचे आत व्हाईस रेकॉर्डर लावुन माझी चारचाकी इनोवा क्रिस्टा क्र. एम एच 12 पी एन-8099 या गाडीने 14/08 वा. सुमारास रवाना केले. आमचे मागोमाग लागलीच सापळा पथक शासकीय वाहनाने रवाना होवून ग्रामपंचायत कार्यालयाचे आजुबाजुला थांबुन माझे इशा-याची वाट पहात होते. मी व पंच क्र.1श्री. पाबळे असे ग्रामपंचायत कार्यालय, भांबर्डे येथे जावुन श्रीमती भुजबळ यांची भेट घेतली. सदरवेळी आमचेत इतर कामाबाबत चर्चा झाली. त्यावेळी मी माझ्या उजव्या हाताने पॅटच्या पुढील उजव्या खिशातुन लाच रकमेची 02 बंडले काढुन त्यांचेसमोर धरुन हे धरा, पेव्हर ब्लॉकचे असे म्हणालो असता त्यावर श्रीमती भुजबळ म्हणाल्या की, ठेवा त्याच्यात (असे म्हणुन टेबलचा लाकडी ड्रॉवर दाखविला) त्यावर मी म्हणालो की, ऐकाना माझ्याकडे परत पेमेंट असतय नसतयं कुटाना असतोय त्याच्यामुळ मग ते, बर ऐकाना पेवर ब्लॉकचे 10 हजार ठेवल्यात आणि सचिन चे ते अंगणवाडीचे 50 ठेवतोय, तुमच्या टेबलला ठेवतो डॉवरला ऐका ना, ते बांधुन घ्या मात्र हा? ते बांधुन घ्या, साहेब कोण आलं तर कुटाना होईल असे म्हणुन श्रीमती भुजबळ यांनी सांगितल्याप्रमाणे लाच रक्कम ही टेबलचा लाकडी ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारली आहे. त्यानंतर मी पो.नि. माने यांना लाच रक्कम स्विकारल्याचा उजव्या हाताचा अंगठा दाखवुन नियोजीत इशारा केला असता पोनि. माने, पंच व सापळा पथक असे कार्यालयात आले. त्यावेळी मी त्यांना श्रीमती भुजबळ यांचेबाबत माहिती देवून त्यांनीच लाच रक्कम टेबलच्या लाकडी ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगुन लाच रक्कम स्विकारल्याचे सांगितले. त्यावरुन सापळा पथकाने श्रीमती भुजबळ यांना 14/47 वा. सुमारास ताब्यात घेतले. सदर वेळी शासकीय पंचासमक्ष लाच रक्कम हस्तगत करण्यात आली असुन त्याची कॅमेरामध्ये व्हिडीओ रेकॉडींग करण्यात आलेली आहे. याबाबतचे सविस्तर पंचनामे य स्क्रिप्ट पंचासमक्ष करण्यात आलेले आहेत.

तरी मी दि.27/03/2025 रोजी ग्रामपंचायत भांबर्डे येथे पेव्हर ब्लॉक बसविलेल्या कामाचा बिलाचा मोबदला तसेच ग्रामपंचायत हद्दीतील अंगणवाडी बांधकामातील उर्वरीत बिलाचे चेक काढण्याचा मोबदला म्हणून एकुण बिलाच्या 6 टक्के अथवा60,000/- रु लाच मागणी होत असल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन दि.01/04/2025, दि.

03/04/2025. दि.15/04/2025 रोजी करण्यात आलेल्या पडताळणी कारवाई मध्ये श्रीमती भुजबळ यांनी स्वतःकरीता लाच मागणी केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्यावरुन दि.28/04/2025 रोजी करण्यात आलेली सापळा कारवाई मध्ये श्रीमती निर्मला कैलास भुजबळ, ग्रामपंचायत अधिकारी, (ग्रामसेवक) ग्रामपंचायत भांबर्डे, ता. शिरुर, जि.पुणे (वर्ग-3) यांनी लाच मागणी करुन रु.60,000/- ची लाच रक्कम ग्रामपंचायत कार्यालय भांबर्डे, ता. शिरुर जि. पुणे येथे स्विकारली आहे. म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.
तपासी अधिकारी-पो नि विरनाथ माने (ला प्र वि पुणे)

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

mahadev narayan waghmode(I (Inspector)) / **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

Bode

.4 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** mahadev narayan v
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):**

पोलीस ठाणे अमलदार
राजणगाव M.I.D.C.पोलीस स्टेशन पुणे ग्रा